पुण्य नगरी
रविवार, ५ ऑक्टोबर २०२५

# विवेकानंद महाविद्यालय

**कोल्हापूर** : विवेकानंद महाविद्यालयामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रतिमापूजन गणित विभागप्रमुख डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. दत्ता जाधव यांनी केले. ते म्हणाले, महात्मा गांधी यांनी सत्य, अहिंसा व सत्याग्रह या चिरकालीन संकल्पना जगासमोर मांडल्या. या तत्त्वांना महात्मा गांधी यांनी जीवनात खूप महत्त्व दिले. धर्मनिरपेक्षता आणि मानवता याचबरोबर संघटितपणा यासाठी गांधीजींची विचारसरणी आजही उपयुक्त आहे. दरम्यान, महात्मा गांधी जयंती स्वच्छता सप्ताहानिमित एनएसएस आणि एनसीसी विभागाच्या वतीने स्वच्छता अभियान राबवण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र विभागाने केले.